लक्षवेधी

ट्रम्प यांच्या उपाध्यक्ष पदाच्या उमेदवाराने जिंकली डिबेट

गोवन वार्ता। वॉशिंग्टन : अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीपूर्वी उपाध्यक्षपदाच्या उमेदवारांमध्ये डिबेट झाली. डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार टिम वॉल्झ आणि रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार जेडी व्हॅन्स यांच्यात ९० मिनिटे वादावादी झाली. वादविवादानंतर घेण्यात आलेल्या मतदानात डोनाल्ड ट्रम्प यांचे सहकारी उमेदवार जेडी व्हॅन्स यांना विजयी घोषित करण्यात आले. सर्वेक्षणानुसार, ४२ टक्के लोकांनी व्हॅन्स यांना वादविवादाचा विजेता मानले. त्याचवेळी, ४१ टक्के लोकांचा असा विश्वास होता की, टिम वॉल्झ जिंकले. १७ टक्के लोकांना ही स्पर्धा ड्रॉ वाटत होती. वॉल्झ यांची सुरुवात चांगली झाली नाही, पण नंतर त्यांनी चांगले पुनरागमन केले. त्याचवेळी रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार व्हॅन्स यांनी आपले मत सोप्या शब्दात व्यक्त केल्याचे अनेक तज्ज्ञांनी सांगितले. जेडी व्हॅन्स यांना विजयी घोषित करण्यात आले.

मोंदीवर टीका • हरियाणात निवडणूक प्रचाराचा शेवट

भाजपकडून राज्यघटना संपवायचे काम : राहुल गांधी

न्यूज डेस्क। गोवन वार्ता

नूह : भाजपला राज्यघटना संपवायची असून त्याला आरएसएस पाठिंबा देत आहे. याबाबत ते पुढे येऊन काहीही बोलणार नाहीत, पण ते जे काही करतील ते संविधानाला कमकुवत करणारे आहे, असे राहुल गांधी यांनी सांगितले.

हरियाणातील निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या दिवशी राहुल गांधी नूह येथे पोहोचले. येथे जाहीर सभेत हरियाणातील बेरोजगारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी जबाबदार असल्याचे ते म्हणाले.

नूह हा मुस्लिमबहुल परिसर असून तो काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जातो. राहुल गांधींनी येथून दक्षिण हरियाणा जिंकण्याचा प्रयत्न केला. आपल्या भाषणात त्यांनी भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार निशाणा साधला.

ते म्हणाले की, भाजपने देशात द्वेष पसरवला आहे. भाजप आणि आरएसएस मिळून देशातील संविधान नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र काँग्रेस हे होऊ देणार नाही. अंबानी आणि अदानी यांचे नाव न घेता राहुल म्हणाले की, मोदी सरकारने आपल्या मित्रांसह देशातील २०-२५ लोकांची कोट्यवधींची कर्जे माफ केली, पण शेतकऱ्यांचे किती कर्ज माफ झाले? राहुल यांनी अमेरिका दौऱ्यात भेटलेल्या हरियाणातील तरुणांचा उल्लेख केला. हरियाणा बेरोजगारीमध्ये नंबर वन कसा झाला हे मोदीजींनी सांगावे? राज्यातील तरुणांना घरापासून दूर राहावे लागत आहे.

काँग्रेसचे फिरोजपूर झिरकाचे उमेदवार ममन खान हे देखील राहुल गांधींच्या व्यासपीठावर उपस्थित होते. ममन खानवर हिंसाचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राहुल गांधी यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केलेले माजी खासदार अशोक तंवर.

माजी खासदार अशोक तंवर काँग्रेसमध्ये

हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपला मोठा धक्का बसला आहे. माजी खासदार अशोक तंवर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. महेंद्रगडमध्ये राहुल गांधींनी त्यांचा पक्षात प्रवेश करवून घेतला. तंवर यांनी ८ महिन्यांपूर्वी आम आदमी पक्षाचा (आप) राजीनामा दिला होता. यानंतर अशोक तंवर यांनी दिल्लीत भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला होता.

इस्त्रायलच्या हल्ल्यात हिजबुल्ला प्रमुख हसन नसराल्लाहचा जावई ठार

› सीरियाची राजधानी दमास्कसमध्ये भीषण हवाई हल्ला

न्यूज डेस्क। गोवन वार्ता

तेल अवीव : हिजबुल्ला प्रमुख हसन नसराल्लाह याचा जावई हसन जाफर अल कासिर याला ठार केल्याचा दावा इस्त्रायलने केला आहे. इस्त्रायली लष्कराने बुधवारी सीरियाची राजधानी दमास्कसमध्ये हवाई हल्ला केला, ज्यात त्याचा मृत्यू झाला. त्याच्यासह आणखी दोन जणांचा मृत्यू झाला आहे.

२७ सप्टेंबर रोजी इस्त्रायलने राजधानी बेरूतमधील हिजबुल्लाच्या मुख्यालयावर ८० टन बॉम्बने हल्ला केला. यात हिजबुल्लाचा प्रमुख नसरल्लाह मारला गेला. या हल्ल्यात नसराल्लाशिवाय त्यांची मुलगी झैनब हिचाही मृत्यू झाला होता.

इस्त्रायल एकाच वेळी अनेक आघाड्यांवर लढत आहे. लेबनॉनमधील हिजबुल्लाह, गाझामधील हमास, येमेनमधील हौथी बंडखोरांशिवाय इस्त्रायली सैन्याचा सामना सीरिया आणि इराणशीही होत आहे.

हल्ल्यात हिजबुल्लाचे १५ सदस्य ठार

आयडीएफने बुधवारी रात्री लेबनॉनमधील बिंट जबल गावात एका इमारतीवर हवाई हल्ला केला. या हल्ल्यात हिजबुल्लाचे १५ सदस्य ठार झाले. इस्त्रायलने या हल्ल्याचा व्हिडिओही जारी केला आहे.

क्लासिफाईडस

पाहिजेत

Wanted Urgently Waiter, Dish Washer, Kitchen Helper and Tandori Cook for Furtado's Restaurant, Sernabatim, Benaulim, South Goa. 6 kms from Margao Railway Station / KTC Bus Stand. 9604251535

CHANGE OF NAME

I, **SHAENA IBRAHIM SHAIK,** R/o. H.No. 95, Near Ganpat Garage, Pixem Dongri, Vasco, Mormugao, South Goa 403802, hereby change my name from **SHAENA IBRAHIM SHEIK** to **SHAENA IBRAHIM SHAIK.** Hereafter in all my dealings & documents, I will be known by the name **SHAENA IBRAHIM SHAIK.**

Sandeep Ads

CHANGE IN NAME

I, **NOXIMA BI** r/o H. No. 3/31/B Parri Cotta, Near Canal, Cuncolim, South-Goa, Goa, would like to change my name from **NAXIMA BI** TO **NOXIMA BI.** Henceforth I will be known as **NOXIMA BI** in all my documents, proceedings and dealings.

BOSS - 9822100065

CHANGE IN NAME

I, Rita Aloysia Braganza r/o H No 1050/G Bethmoddi, Kakoda, South Goa,403706, Goa, India Hereby change my name from Rita Aloysia Braganza to Rita Aloysia Braganca. Hereafter in all my dealings and documents I will be known as Rita Aloysia Braganca.

sd/-
Rita Aloysia Braganza

Costy's Ads, Chinchinim 9850473904

ईशा फाऊंडेशन विरोधातील चौकशीला स्थगिती

› सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाकडून स्वत:कडे घेतले प्रकरण

न्यूज डेस्क। गोवन वार्ता

कोईम्बतूर : थोंडामुथूर येथील अध्यात्मिक गुरू जग्गी वासुदेव (सद्गुरु) यांच्या ईशा फाऊंडेशनविरुद्ध मद्रास उच्च न्यायालयाने दिलेल्या चौकशीला सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी स्थगिती दिली. यासह सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण स्वत:च्या हातात घेतले आहे. फाऊंडेशनने उच्च न्यायालयाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

निवृत्त प्राध्यापकाकडून आरोप

निवृत्त प्राध्यापक एस. कामराज यांनी याचिका दाखल केली आहे. कामराज यांनी आरोप केला आहे की, ४२ आणि ३९ वयोगटातील त्यांच्या दोन शिक्षित मुलींना कोईम्बतूर येथील ईशा योग केंद्रात राहण्यासाठी 'ब्रेनवॉश' करण्यात आले आहे. कामराज यांनी न्यायालयाला सांगितले की, फाऊंडेशनच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या मुलींना त्यांच्या कुटुंबाशी संपर्क साधू दिला नाही. फाऊंडेशनवर अनेक गुन्हेगारी प्रकरणे आणि लैंगिक छळ आणि गैरवर्तनाचे आरोप प्रलंबित आहेत.

मद्रास उच्च न्यायालयाने ३० सप्टेंबर रोजी याबाबत आदेश दिला होता. आपल्या आदेशात उच्च न्यायालयाने पोलिसांना आश्रमातील बेकायदेशीर कामांच्या आरोपांची चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. यानंतर मंगळवारी अधिकाऱ्यांसह पोलीस पथक आश्रमात घुसले आणि झडती घेतली. उच्च न्यायालयाने पोलिसांना दिलेल्या सूचनांना आम्ही स्थगिती देतो, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

राशीभविष्य

मेष - आजचा दिवस कुटुंबासाठी व स्वतःसाठी खूप चांगला आहे. योग्य शब्दांचा आणि नेमक्या कृतीचा अवलंब करून वाटचाल करणार आहात. तुमच्या वागण्या बोलण्याने महत्त्वाची कामे करून घ्याल.

वृषभ - कामाचे नियोजन चांगले असेल, व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवल, कष्टाचे चीज झाल्यासारखे वाटणार आहे. आर्थिक फायदे झाल्याने घरातील वातावरण आनंदाचे असणार आहे.

मिथुन - प्रवासाची शक्यता आहे. प्रवास करताना काळजी घेणे आवश्यक आहे. आर्थिक व्यवहार जपून करावेत, खर्च होण्याची शक्यता आहे. मात्र शक्ती पेक्षा युक्ति ने मार्ग काढा.

कर्क - आपल्या स्वतःच्या कार्यक्षेत्रामध्ये स्वतःला सिद्ध करण्यासाठी संधी मिळेल. लक्ष्मी प्राप्तीचे योग चालून येणार आहे. जमीन व महत्त्वाची कामे करून घ्या, मात्र व्यवहार काळजीपूर्वक करा.

सिंह - आजचा दिवस सुरळीत जाणार आहे. महत्त्वाच्या कामाचे नियोजन करून काम करण्यास सुरुवात करा, मनासारखी पूर्ण होतील. काम जरी जास्त करावे लागले तरी कामाचा आनंद मिळेल.

कन्या - विद्यार्थ्यांना आजचा दिवस अभ्यासासाठी चांगला आहे.नोकरी व्यवसाय करणाऱ्यांनाआजचा दिवस अनुकूल आहे. लेखक कवी यांना अनुकूल सृजनशीलता मध्ये वाढ होईल. शेअर्समध्ये अनुकूल दिवस.

तुळ - आजचा दिवस तुमची कसोटी पहाण्याचा आहे. नोकरीमध्ये जास्त काम करावे लागणार आहे. हाताखालील व्यक्तींचे सहकार्य मिळेल. मात्र जास्त कामाचा ताण जाणवणार आहे.

वृश्चिक - तुम्ही हाती घेतलेले काम कुठे आडते आहे याचा विचार करणे फार आवश्यक आहे. त्यावर लक्ष केंद्रित केल्यास कामाला गती मिळेल. भागीदारीच्या व्यवसायात फायद्याचा दिवस आहे.

धनु - मनोबल वाढवा. कोणी कोणाचा नसतो हे जाणूनच आहात, त्यामुळे मनस्ताप होणार नाही या दृष्टीने विचार करा. कोणाचेही वागणे खटकले तरी जास्त टोकाची भूमिका घेऊ नका.

मकर - उद्योग व्यवसायात तुमच्या संकल्पना अमलात आणा, त्याचा चांगलाच फायदा तुम्हाला दिसून येईल. तुमचे नियोजन हे चांगले असेल, तुमच्या कामांमध्ये वाढ होईल. बेरोजगारांना संधी मिळेल.

कुंभ - नोकरी-व्यवसायात काम वाढणार आहे. महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागणार आहेत, पण हे निर्णय सहकारी आणि वरिष्ठ यांच्या सल्ल्यानेच घ्यावे. वरिष्ठांची मर्जी राखणे आवश्यक आहे.

मीन - जिद्द व आत्मविश्वासाने कामाला लागाल. कामांमध्ये प्रगती जाणवेल, सहकारी व्यक्तींचे सहकार्य मिळेल. परदेशासंबंधी काही महत्त्वाचे काम असल्यास किंवा काही निर्णय घ्यायचे असल्यास ते निश्चित घ्या.

पुण्यात स्कूलबसमध्ये दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार

न्यूज डेस्क। गोवन वार्ता

पुणे : राज्यात बदलापूर प्रकरण ताजे असतानाच मुलींवरील अत्याचार सुरूच आहेत. बुधवारी पुण्यात वानवडी येथे एका स्कूलबस चालकाने शाळेतील दोन अल्पवयीन मुलींवर व्हॅनमध्ये लैंगिक अत्याचार केल्याचे उघड झाले आहे. मुलींनी याची माहिती पालकांना दिल्यावर या प्रकरणी वानवडी पोलीस ठाण्यात स्कूलबस चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संजय जेटिंग रेड्डी (वय ४५, रा. वैदवाडी हडपसर) असे संशयित आरोपीचे नाव आहे. ३० सप्टेंबर रोजी शाळेजवळ व्हॅनमध्ये हा प्रकार घडला. पीडित मुली वानवडी येथील एका शाळेत शिक्षण घेतात. पीडित मुलगी ही स्कूलबसमधून घरी येत होती. यावेळी तिची मैत्रीण देखील स्कूलबसमध्ये होती. यावेळी आरोपी रेड्डीने ही संधी साधून दोन्ही मुलींवर लैंगिक अत्याचार केले. यातील एका मुलीने तिच्या सोबत घडलेला प्रकार पालकांना सांगितला. यानंतर या घटनेचा उलगडा झाला. त्यानंतर पालकांनी पोलिसांत तक्रार दिली.

CHANGE OF NAME

I, **ASRAT JAN,** w/o Muzavor Shaikh Kassim Shaikh Latif, r/o Flat No. F-12, 1st Floor, Raza Enclave, Sirvodem, Navelim, Margao - Goa, has changed my name from **SHAIKH ISHRATE QASSIM MUZAWAR** to **ASRAT JAN.**
Hereafter, in all my dealings and documents, I will be known by the name **ASRAT JAN.**
Sd/- ASRAT JAN

CHANGE OF NAME

I, **MUZAVOR SHAIKH KASSIM SHAIKH LATIF,** s/o Shaikh Abdul Latif Muzavor, r/o Flat No. F-12, 1st Floor, Raza Enclave, Sirvodem, Navelim, Margao - Goa, has changed my name from **SHAIKH QASSIM MUZAWAR** to **MUZAVOR SHAIKH KASSIM SHAIKH LATIF.**
Hereafter, in all my dealings and documents, I will be known by the name **MUZAVOR SHAIKH KASSIM SHAIKH LATIF.**
Sd/- MUZAVOR SHAIKH KASSIM SHAIKH LATIF

VILLAGE PANCHAYAT DONGURLI - THANE, SATTARI, GOA

Ref. No. VP / DT / SATT / E-Tender Notice / 2024-25 / 558 Date : 16.09.2024

TENDER NOTICE (e-Tendering with e-Payment Mode)

The Office of Village Panchayat Dongurli Thane Sattari Goa invites online Percentage Rate Tender from approved and eligible contractor / agencies for the following works:

Sr. No.	Name of Work & Location	Estimated Cost
1.	Construction of Cattle Pound in Sy. No. 5/2 of Dongurli Village in V.P. Dongurli Thane Sattari Goa	Rs. 5,95,604.00

TENDER SCHEDULE **1.** The last date of online submission of tender is 11/10/2024 up to 16:00 hrs. **2.** The date & time of opening of online tender is 14/10/2024 after 15:00 hrs in the office of the Sarpanch, Dongurli Thane, Goa.
For all participation & other details visit on e-tendering website (https://eprocure.goa.gov.in)
Sd/- **Nilesh S. Parwar (Sarpanch) V. P. Dongurli - Thane, Sattari** (Seal)

TRANSFER OF VEHICLE

Notice is hereby given that late **Sunderrao Mulgaonker** who expired on **27/02/2015** is the owner of **Maruti Swift VXI** bearing Reg. No. **GA-08-E-9573.** The above-mentioned vehicle is now being transferred in my name **Shailesh Mulgaonker** (son) R/o. Aquem, Margao-Goa.
If anyone has any objection, please notify the R.T.O. **Margao** at **South Goa** within 15 days from the publication of this notice.
Sd/- **Shailesh Mulgaonker**

CHANGE OF NAME

I, **SHAIKH SADEEM MUZAVOR,** s/o Muzavor Shaikh Kassim Shaikh Latif, r/o Flat No. F-12, 1st Floor, Raza Enclave, Sirvodem, Navelim, Margao - Goa, has changed my name from **SHAIKH SADEEM MUZAWAR** to **SHAIKH SADEEM MUZAVOR.**
Hereafter, in all my dealings and documents, I will be known by the name **SHAIKH SADEEM MUZAVOR.**
Sd/- SHAIKH SADEEM MUZAVOR

Government of Goa
Office of the Village Panchayat
Assolda, Xelvona, Xic-Xelvona & Hodar
P.O. Chandor - Goa.
(E-TENDERING MODE ONLY)
Tender Notice No: VP/ASD/487/2024-2025 dt. 01/10/2024 has been issued and the same has been displayed on Website
https://eprocure.goa.gov.in
for participation of the interesting Contractors in e-tender. For details contact above office.
Sd/-
Sarpanch,
Village Panchayat Assolda
(Seal)

OFFICE OF THE VILLAGE PANCHAYAT
MAJORDA UTORDA CALATA,
Majorda, Salcete- Goa 403 713,
Email: vpmajordautordacalata1@gmail.com Tel: 0832- 2881435

No. VP/MUC/Quot.file/ 2024-25/777
Date: 01/10/2024

SWACHA BHARAT ABHIYAN
Cleanliness is our Culture, Which comes through family

QUOTATION NOTICE

The Village Panchayat Sarpanch Majorda Utorda Calata invites sealed quotation for the collection of road side plastic garbage of all 09 wards from 12th October 2024 to 31st March 2025. Slope of work: 1.Collection of Plastic waste from Road sides in the Jurisdiction of V.P Majorda-Utorda-Calata.
The Quotation should reach to this office on or before 14/10/2024 upto 12:00 noon and same will be opened on the same day at 1:00 noon in presence of quotation holders and V.P.members if any. The Panchayat reserves the right to accept or reject any or all the quotation received without the assignment of any reason.

Sd/-
(Seal) **(Linet Vaz)**
Sarpanch
V.P.Majorda-Utorda-Calata

कर्ज वसुली न्यायाधिकरण-I, दिल्ली
चौथा मजला, जीवन तारा बिल्डिंग, पार्लमेंट स्ट्रीट, नवी दिल्ली-110001.
ओए क्र. 106/2024
आयसीआयसीआय बँक लिमिटेड
विरुद्ध
श्री. जय पौड्याल

प्रति,
(1) श्री. जय पौड्याल श्री. गंगाराम यांचा मुलगा, राहणार ए- 3/112, दुसरा मजला सेक्टर-11, रोहिणी उत्तर पश्चिम जिल्हा, दिल्ली-110085
आणि इथेही -
फ्लॅट क्र. 701, 7वा मजला, टॉवर-9, गोवा पॅरेडाइज रिओ दे गो, सर्व्हे क्र. 215/1, सांकवाळ मुरगाव, दक्षिण गोवा, मडगाव-403601
आणि इथेही -
711 येथे काम, पर्ल्स बेस्ट हाइट्स-2, एनएसपी पितमपुरा, दिल्ली-110034
(2) श्रीमती सुरभी पौड्याल (सह-अर्जदार) श्री जय पौड्याल यांची पत्नी, राहणार ए- 3/112, दुसरा मजला सेक्टर-11, रोहिणी उत्तर पश्चिम जिल्हा, दिल्ली-110085
(3) मेसर्स. टाटा हाऊसिंग डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड (डेव्हलपर/बिल्डर), 12वा मजला, कमला मील कंपाऊंड, सेनापती बोपाळ मार्ग, लोव्हर परळ (पश्चिम), मुंबई-400013.
आणि इथेही – ट्रेड वर्ल्ड येथे कॉर्पोरेट कार्यालय, बी-विंग, 2रा मजला, कमला मील कंपाऊंड, सेनापती बोपाळ मार्ग, लोव्हर परळ (पश्चिम), मुंबई-400013.
उपरोक्त नामांकित अर्जदाराने तुमच्या विरुद्ध रु.50,71,028.64 (रुपये पन्नास लाख एकहत्तर हजार अठ्ठावीस आणि चौसष्ट पैसे फक्त) च्या वसुलीसाठी खटला दाखल केला आहे आणि सामान्य मार्गाने तुम्हाला सेवा देणे शक्य नसल्याने तो न्यायाधिकरणाच्या समाधानासाठी दर्शविला गेला आहे. त्यामुळे ही नोटीस जाहिरातीद्वारे तुम्हाला एलडी रजिस्ट्रार यांच्यासमोर दिनांकित 23.01.2025 रोजी सकाळी 10:30 वा. हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत. (अधिक तपशीलांसाठी कृपया डीआरटी संकेतस्थळ www.etribunal.gov.in फोन नंबर: 011-23748473 ला भेट द्या). या न्यायाधिकरणासमोर तुम्ही वर नमूद केलेल्या दिवशी हजर न राहिल्यास, तुमच्या अनुपस्थितीत खटल्याची सुनावणी आणि निर्णय घेतला जाईल याची नोंद घ्या.
सर्व प्रकरणे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेतली जातील आणि त्या हेतूसाठी:-सर्व अधिवक्ता/वादी यांनी "सिस्को वेबेक्स" अनुप्रयोग/सॉफ्टवेअर डाउनलोड करावे; 'निबंधक/वसुली अधिकारी-I/ आणि वसुली अधिकारी-II द्वारे घेतलेल्या प्रकरणांच्या सुनावणीच्या पुढील तारखेसाठी मीटिंग आयडी' आणि "पासवर्ड" पुढील तारखेच्या एक दिवस आधी डीआरटी अधिकृत पोर्टलवर म्हणजेच "drt.gov.in" वर सार्वजनिक सूचना शीर्षाखाली उपलब्ध असेल. कोणत्याही अत्यावश्यक परिस्थितीत, वकील/वादक संबंधित अधिकाऱ्याशी फोन नंबर 011-23748473 वर संपर्क साधू शकतात.
माझ्या आदेशाने आणि या न्यायाधिकरणाच्या शिक्क्यासह 11 सप्टेंबर 2024.

या न्यायाधिकरणाच्या आदेशाने
सहाय्यक रजिस्ट्रार

उत्तरदायी पुढील चौकशीसाठी नमूद केलेल्या फोन नंबरवर संपर्क करू शकतो.
एलडी. रजिस्ट्रार डीआरटी -I,
दूरध्वनी क्र: 011-23748473
ईमेल आयडी: drt1delhi-dfs@nic.in

kotak®

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: 27 बीकेसी, सी27, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई- 400 051.
प्रादेशिक कार्यालय: अदमास प्लाझा 4था मजला, 166/16, सीएसटी रोड कोलिवेरी, कुंची गाव, कुर्वे नगर, हॉटेल हरे कृष्णाजवळ, सांताक्रुझ पूर्व, मुंबई – 400098
कॉर्पोरेट ओळख क्रमांक L65110MH1985PLC038137).

ई-लिलाव व विक्रीसाठी सार्वजनिक सूचना

कृपया ही एक नवीन नोटीस म्हणून समजावी, जी सामान्यत: जनतेला आणि विशेषत: कर्जदार/सह-कर्जदार/हमीदार यांना दिली जाते, की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याकडे गहाण ठेवली आहे, ज्याचा भौतिक ताबा **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**च्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, आणि **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे"** आणि **"जे के काही आहे ते"** या आधारावर याची विक्री करण्यात येईल. स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी खाली स्वाक्षरी केलेल्याद्वारे आमच्या ई-लिलाव सेवा भागीदार, **मेसर्स सी1 इंडिया प्रा. लि. म्हणजे** www.c1india.com या वेब पोर्टलद्वारे ऑफर ऑनलाइन सबमिट करण्यासाठी आमंत्रित केल्या आहेत, ज्याचे तपशील खाली दिले आहेत:

कर्जदारांचे /हमीदारांचे /गहाणखतदारांचे नाव	मागणी सूचना तारीख आणि रक्कम	अचल मालमत्तांचे वर्णन
1.श्री. गोकुळदास हुलो गावडे (कर्जदार) **2.मांगिरीष डायग्नोस्टिक्स** (सह-कर्जदार) **(कर्ज खाते क्र. LAP18058369 आणि LAP18058938**	**मागणी सूचना तारीख:** 30.07.2021 कर्ज खाते क्र. LAP18058369 रु. 1,08,02,701.26 (रुपये एक कोटी आठ लाख दोन हजार सातशे एक आणि सव्वीस पैसे फक्त) आणि **कर्ज खाते क्र. LAP18058938** **रु.** 39,82,260.88 (रुपये एकोणचाळीस लाख ब्याऐंशी हजार दोनशे साठ आणि अठ्ठ्याऐंशी पैसे फक्त) **एकूण एकत्रित रु.** 1,47,84,962/- (रुपये एक कोटी सत्तेचाळीस लाख चौऱ्याऐंशी हजार नऊशे बासष्ट फक्त) 28.07.2021 प्रमाणे	दुकान एफ-17, एफ-18 आणि एफ-19 चा तो सर्व अविभाज्य भाग, पहिला मजला, रॉयल चेंबर्स, सर्व्हे क्र.188/1 आणि 188/4, फोंडा येथे स्थित, कॅनरा बँक एटीएमच्या जवळ, फोंडा तालुका, उत्तर गोवा, गोवा, फोंडा, 403703.

आरक्षित मूल्य	अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी)	लिलावाची तारीख आणि वेळ
रु. 2,54,46,204/- (रुपये दोन कोटी चोपन्न लाख सेहेचाळीस हजार दोनशे चार फक्त)	**बोली रकमेच्या 10% म्हणजेच रु.** 25,44,620/- (रुपये पंचवीस लाख चव्वेचाळीस हजार सहाशे वीस फक्त)	**अचल मालमत्तांच्या तपासणीची तारीख** 15 ऑक्टोबर 2024, दुपारी 3 ते 4 यावेळेत **ऑफर/ईएमडी सादर करण्याची शेवटची तारीख:** 24.10.2024 संध्याकाळी 5 पर्यंत **लिलावाची तारीख आणि वेळ:** 25.10.2024, सकाळी 11 ते दुपारी 12 यावेळेत.

विक्रीच्या महत्त्वाच्या अटी आणि नियम:
(1) लिलाव बोली दस्तऐवजाच्या पुढील अटी व शर्तींनुसार आणि त्यात नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार आयोजित केला जातो. बोलीदार बोली दस्तऐवज, ई-लिलावासाठी ठेवलेल्या सुरक्षित मालमत्तेचे तपशील आणि ऑनलाइन सबमिट केले जाणारे बोली फॉर्मसाठी आमच्या ई-लिलाव सेवा प्रदाता, **मेसर्स सी1 इंडिया प्रा. लि.** म्हणजेच, https://www.bankeauctions.com_ या वेबसाइटवरून जाऊ शकतात. ई-लिलावासाठी ठेवलेल्या सुरक्षित मालमत्तेचे तपशील आणि बोली फॉर्म जो शाखा कार्यालय/क्षेत्रीय कार्यालयातील अधिकृत अधिकाऱ्याकडे वरीलप्रमाणे प्रदान केला जाईल; (2) सर्व इच्छुक खरेदीदार/बोलीदार यांनी वर नमूद केलेल्या वेब पोर्टलवर https://www.bankeauctions.com आपल्या नावाने आपली नाव नोंदणी करणे आवश्यक आहे आणि वरील तारीख आणि वेळी ई-लिलावामध्ये सहभागी होण्यासाठी त्यांचा वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड विनामूल्य तयार करणे आवश्यक आहे. (3) ई-लिलावावरील कोणत्याही चौकशी, माहिती, समर्थन, प्रक्रिया आणि ऑनलाइन प्रशिक्षणासाठी, संभाव्य बोलीदार मेसर्स C1 इंडिया प्रा. लि. विभाग आमच्या ई-लिलाव सेवा भागीदार मे. विनोद चौहान यांच्याशी संपर्क साधू शकतात, दूरध्वनी क्रमांक: **+91 7291971124,25,26, मोबाइल क्रमांक:** 9813887931 **आणि ई-मेल** delhi@c1india.com & support@bankeauctions.com; (4) प्राधिकृत अधिकाऱ्याच्या उत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्तेमध्ये कोणताही भार नाही. तथापि, इच्छूक बोलीदार वर नमूद केल्याप्रमाणे मालमत्तेची आणि त्याच्या कागदपत्रांची किंवा इतर कोणत्याही तारीख आणि वेळेची आधी भेट घेऊन तपासणी करू शकतात आणि त्यांनी ई-लिलावात टाकलेल्या मालमत्तेचे मालमत्तेवर परिणाम करणारे माहितीचे शीर्षक आणि दावे/हक्क/देय/ याबाबत स्वतःची स्वतंत्र चौकशी त्यांची बोली सबमिट करण्यापूर्वी करावी. ई-लिलाव जाहिरातीमध्ये कोणतीही वचनबद्धता किंवा केएमबीएलचे कोणतेही प्रतिनिधित्व नाही. केएमबीएलला ज्ञात किंवा अनोळखी सर्व विद्यमान आणि भविष्यातील भारांसह मालमत्ता विकली जात आहे. अधिकृत अधिकारी/सुरक्षित कर्जदार कोणत्याही तृतीय पक्षाचे दावे/हक्क/देयांसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही; (5) ई-लिलावात सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोलीदारांनी नाशिक येथे देय असलेल्या 'कोटक महिंद्रा बँक लिमिटेड'च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे वर नमूद केल्याप्रमाणे सुरक्षित मालमत्ता पॅनकार्ड, आधार कार्ड, रहिवासी पत्ता पुरावा, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याच्या पुराव्याच्या स्वयं-साक्षांकित प्रतीसह वेब पोर्टलवर (https://www.bankeauctions.com) व्याजमुक्त परतावाच्या अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) च्या पेमेंटचे तपशील वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे सबमिट/अपलोड करावे लागतील. (6) ई-लिलावामध्ये यशस्वी न झालेल्या इतर सर्व बोलीदारांचे ईएमडी केएमबीएलद्वारे ई-लिलावाच्या कालावधीच्या 72 तासांच्या आत परत केले जाईल. ईएमडीमध्ये कोणतेही व्याज असणार नाही; (7) खरेदीच्या मोबदल्याची शिल्लक रक्कम यशस्वी खरेदीदार/बिडरद्वारे अधिकृत अधिकारी/सुरक्षित धनको किंवा अशा वाढीव कालावधीने सांगितलेल्या सुरक्षित मालमत्तेच्या 'विक्रीची पुष्टी' झाल्याच्या तारखेपासून पंधराव्या (15 व्या) दिवशी किंवा त्यापूर्वी देय असेल. प्राधिकृत अधिकाऱ्याने त्याच्या/तिच्या विवेकबुद्धीनुसार लेखी सहमती दर्शविल्यास, तोपर्यंत जमा केलेली सर्व रक्कम जप्त केली जाईल; (8) मालमत्तेची तपासणी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत प्रतिनिधी, **श्री अशोक मोटवानी (मोबाईस क्र: +91 9873737351, ईमेल आयडी:**Ashok.motwani@kotak.com), **श्री इस्माईल देशमुख (मोबाईस क्र.:** 9324906979 **ईमेल आयडी:** Ismail.Deshmukh@kotak.com) यांच्याशी संपर्क साधू शकतात. (9) ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/मोडिटी/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो. कोणतीही बोली नाकारली गेल्यास, अधिकृत अधिकारी प्रस्तुत केलेल्या किंवा इच्छुक बोलीदारांपैकी किंवा खाजगी कराराद्वारे मालमत्तेच्या विक्रीसाठी इतर पक्षांशी वाटाघाटी करू शकतात; (10) विक्री अधिकृत अधिकाऱ्याच्या पुष्टीकरणाच्या अधीन आहे. यशस्वी खरेदीदार/बिडरने कायद्यानुसार कोणतीही वैधानिक थकबाकी, कर, देय शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इत्यादि सहन करावे लागतील त्यानुसार मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या बाजूने पोहोचवण्यासाठी/वितरित करण्यासाठी भरावे लागेल. (11) ही विक्री वेळोवेळी सुधारित केलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत विहित नियम/शर्तींच्या अधीन असेल; विक्रीची नोंदणी करून घेण्याची जबाबदारी केवळ यशस्वी बोलीदार/खरेदीदाराची असेल. मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, हस्तांतरण शुल्क आणि वरील संदर्भित मालमत्तेच्या विक्रीच्या नोंदणीच्या संदर्भात इतर कोणतेही खर्च आणि शुल्क संबंधित सर्व खर्च यशस्वी बोलीदार/खरेदीदाराने उचलले जातील. विक्रीची लवकरात लवकर नोंदणी करावी लागेल अन्यथा खरेदीदाराने नोंदणीला उशीर होण्याचे कारण नमूद करणारे विनंती पत्र केएमबीएलला द्यावे लागेल; (12) ई-लिलाव/विक्री कार्यवाहीमध्ये इच्छुक बोलीदार/ऑफर व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीला किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीला भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही. असे अधिकृतता पत्र बिड दस्तऐवजांसह सादर करणे आवश्यक आहे; (13)